क्रमांक : १५

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग-दोन

**गुरुवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ / फाल्गुन ५, १९४३ (शके)**

१५. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार म.वि.स. नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना, नियम २९३ अन्वये सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबींवर चर्चा तसेच नियम २९२ अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावाबाबत मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे निदेशान्वये पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहे :-

(१) महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनासाठी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये द्यावयाच्या लक्षवेधी सूचना संपूर्णत: ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येत असून लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबंधित असणे आवश्यक असून सूचनेचे प्रारुप शक्यतोवर १५० ते १७५ शब्दमर्यादेत असावे व ऑफलाईन पध्दतीने दिलेल्या लक्षवेधी सूचना ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(२) महाराष्ट्र विधानसभा नियम २९३ अन्वये सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबींवर चर्चा व नियम २९२ अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावाची सूचना देतेवेळी प्रारुप केवळ तीन ते चार विभागांशी संबंधित असावेत. उपरोक्त मार्गदर्शक सूचनांचे पालन होण्याच्या दृष्टीने सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. तसेच उपरोक्त आयुधांच्या सूचना स्वीकृती संबंधी सूचनेचे प्रारुप सुधारण्यासंबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचाच राहील. याची कृपया नोंद घेण्यात यावी.

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२२

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :-**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
५. मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
६. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील पक्ष कार्यालये.
७. कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
८. संगणक कक्ष (WEBSITE).
९. एम.के.सी.एल कक्ष (MKCL).